
ePaper

मुंबईसह 5 विमानतळं बॉम्बने उडवणार, दिल्ली स्फोटानंतरच्या धमकीने खळबळ

वर्ष - 9 । अंक -81 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- ऑक्सिजन पातळी ५०वर, अंधारी
- भारत-आफ्रिका सामन्याची वेळ बदलली!
- तीनशेहून अधिक ठिकाणी छापे
- दिल्ली स्फोट हा दहशतवादी हल्लाच!


www.mahaenews.com । गुरुवार, दि. 13 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**राजकीय वर्तुळात खळबळ** पवार काका-पुतणे एकत्र येणार, दोन्ही राष्ट्रवादींच्या एकीच्या हालचाली

# महायुतीला मोठा धक्का!

## सुप्रिया सुळेंची साद, खुद्द अजितदादांची तयारी

। पुणे। प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**महाराष्ट्रातील राजकीय पटावर पुन्हा एकदा पवार घराण्याच्या चालीनं वळण घेतलं आहे. सत्तेच्या समीकरणात प्रत्येक मोहरा विचारपूर्वक रचला जातो — आणि या वेळी तो मोहरा संवादाच्या रूपात पुढे आला आहे. सुप्रिया सुळे यांनी टाकलेलं संवादाचं बीज जर अंकुरलं, तर महाराष्ट्रात “एकीचा नवा अध्याय” लिहिला जाऊ शकतो.राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजला असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांमध्ये — शरद पवार आणि अजित पवार — पुन्हा एकत्र येण्याच्या हालचालींना वेग मिळाल्याची माहिती समोर आली आहे. ही घडामोड केवळ राष्ट्रवादी काँग्रेसपुरती मर्यादित नसून, संपूर्ण महायुतीच्या राजकीय गणितावर त्याचा परिणाम होऊ शकतो.,अशी चर्चा राज्याच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.**

### सुप्रिया सुळेंचा पुढाकार — संवादाची नवी दारे उघडली

अजित पवार आणि सुप्रिया सुळे या भाऊ–बहिणींमध्ये अलीकडेच झालेल्या संवादातून मोठ्या राजकीय घडामोडींची बीजे रोवली गेल्याची माहिती समोर आली आहे.



पिंपरी-चिंचवड येथील अजित पवार गटाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी याबाबतचा मोठा दावा केला आहे. त्यांनी सांगितले की, “अजितदादा आणि सुप्रिया ताई यांच्यात आगामी निवडणुकांसंदर्भात संवाद झाला आहे. खुद्द अजितदादांनी शरद पवारांशी चर्चा करणार असल्याचं सांगितलं आहे. त्यानंतरच अंतिम निर्णय होईल.”

या विधानानंतर राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. याचा अर्थ असा घेतला जात आहे की, स्थानिक पातळीवर दोन्ही राष्ट्रवादींचा एकत्रितपणे लढण्याचा प्रयत्न सुरू आहे, आणि या एकीचा परिणाम थेट राज्यातील मोठ्या राजकीय समीकरणांवर होऊ शकतो.

### स्थानिक निवडणुका- एकीचं व्यासपीठ?

महाराष्ट्रातील 246 नगरपालिका आणि 18 नगरपंचायतींसाठी लवकरच मतदान पार पडणार आहे. या निवडणुकांपूर्वी अनेक ठिकाणी स्थानिक स्तरावर वेगवेगळ्या युती आणि आघाड्यांचे प्रयोग सुरू आहेत. अनेक पक्ष स्थानिक

## विरोधकांना नवे बळ मिळणार

राज्यातील राजकीय स्थैर्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. आणि 2029 च्या विधानसभा निवडणुकांसाठी नवं समीकरण तयार होऊ शकतं. राजकीय तज्ज्ञांचं मत आहे की, अजित पवारांसाठी ही एक “प्रतिमा पुनर्बांधणी”ची संधी असू शकते, तर शरद पवार गटासाठी कार्यकर्त्यांच्या बळकटीचा नवा मार्ग.

स्वार्थ, सामाजिक समीकरणं आणि सत्तेच्या गणितात तडजोड करत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पवार काका-पुतण्यांची एकी ही स्थानिक निवडणुकीच्या दृष्टीने निर्णायक ठरू शकते.

पिंपरी-चिंचवड, पुणे, कोल्हापूर, बार्शी आणि बीडसारख्या ठिकाणी दोन्ही गटांचे कार्यकर्ते एकाच व्यासपीठावर दिसू लागले आहेत. चंदगड नगरपालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादींचा एकत्रित सहभाग आधीच झालेला असून, तेथूनच या नव्या समीकरणाला उर्जा मिळाल्याचं राजकीय जाणकारांचं मत आहे.

### भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी रणनीती?

राज्यात गेल्या काही वर्षांत झालेल्या सत्ता परिवर्तनानंतर महायुतीने (भाजप–शिंदे गट–अजित पवार गट) सत्ता हस्तगत केली. मात्र, या युतीतील अंतर्गत मतभेद, नाराजी आणि जनतेत वाढत चाललेला असंतोष हे घटक पाहता, आगामी स्थानिक निवडणुकांमध्ये भाजपला मोठा फटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जातो.

अशा पार्श्वभूमीवर “भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येण्याचा प्रयत्न करत आहेत का?” हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. कारण, यापूर्वीही बीड, बार्शी, आणि चंदगडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी गटांनी एकत्र लढून भाजपला पराभूत केलं होतं.

- **“दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार?” — योगेश बहलांचा मोठा दावा**
- **“अजितदादा शरद पवारांशी चर्चा करतील” — सुप्रिया सुळेंचा पुढाकार**
- **कोल्हापूर, बीड, बार्शीनंतर आता पुण्यातही एकीची चर्चा**
- **महायुतीतील नेत्यांमध्ये चिंता, भाजप गोटात हालचाल**
- **पवार घराणं पुन्हा एकत्र येणार का? — राज्याचं लक्ष या भेटीकडे**

जर ही एकी स्थानिक स्तरावर मजबूत झाली, तर भविष्यातील विधानसभा व लोकसभा निवडणुकांमध्येही तिचा मोठा परिणाम दिसून येऊ शकतो.

### शरद पवार–अजित पवार: फुट ते एकीचा प्रवास

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात नाट्यमय राजकीय घडामोडी घडल्या. अजित पवारांनी शरद पवारांचा हात सोडून भाजपसोबत जाऊन अल्पावधीतच उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर काही दिवसांतच त्या सरकारचा कोसळलेला अध्याय साऱ्यांच्या लक्षात आहे.

मात्र, काही महिन्यांपूर्वी अजित पवारांनी पुन्हा एकदा शरद पवारांचा पक्ष सोडून महायुतीत प्रवेश केला आणि उपमुख्यमंत्री म्हणून सत्ता हस्तगत केली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट अधिकृतपणे निर्माण झाले —

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)

दोन्ही गटांमध्ये एकमेकांविरुद्ध शब्दयुद्ध सुरू असतानाही, वेळोवेळी “दोन्ही राष्ट्रवादी एकच आहेत” अशा चर्चाही सोशल मीडियावर रंगत असतात. आता सुप्रिया सुळे यांच्या पुढाकारामुळे त्या चर्चांना प्रत्यक्ष रूप मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

### राजकीय वर्तुळातील प्रतिक्रिया

या घडामोडींवर विविध स्तरांवरून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत.

काही राजकीय निरीक्षकांचं म्हणणं आहे की, “पवार घराणं नेहमीच सत्ता समीकरणात निर्णायक ठरलं आहे.

## वादग्रस्त जागेचा व्यवहार | बावनकुळे यांचा आपल्याच खात्याला प्रश्न

# अमेडियाला 42 कोटींची नोटीस का?

## कंपनीला बुडवलेले मुद्रांक शुल्क

। पुणे ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**गैरप्रकाराच्या आरोपांनंतर जमीन खरेदीचा व्यवहार रद्द करणाऱ्या अमेडिया कंपनीला बुडवलेले मुद्रांक शुल्क आणि दंड यापोटी ४२ कोटी भरण्याचे आदेश मुद्रांक शुल्क विभागाने नोटिशीद्वारे दिले होते. मात्र, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी 'मुंढवा येथील वादग्रस्त जागेचा व्यवहार रद्द करायचा आहे, तर ४२ कोटी रुपयांची नोटीस का दिली,' असा प्रश्न बुधवारी उपस्थित केला. आपल्याच खात्यातील अधिकाऱ्यांच्या कृतीवर बावनकुळे यांनी अविश्वास दर्शवल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.**



### बोपोडी प्रकरणाची चौकशी

मात्र, हा व्यवहार रद्द करण्यासाठी बुडवलेले मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड असे ४२ कोटी रुपये भरावे लागतील, अशी नोटीस नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने 'अमेडिया'ला बजावली आहे. या पार्श्वभूमीवर, बावनकुळे यांनी, 'व्यवहार रद्द करण्यात येत असेल, तर ४२ कोटी रुपयांची नोटीस कशाला, याचा तपास करावा लागेल,' असे वक्तव्य केले .भाजपच्या शहर कार्यालयात महसूलमंत्री बावनकुळे बुधवारी आले होते.

पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने मुंढव्यातील महार वतनाची जागा खरेदी केल्याच्या व्यवहारात गैरप्रकार झाल्याच्या आरोपांचे मोहोळ उठल्यानंतर हा करारच रद्द करण्यात येईल, अशी भूमिका पार्थ यांचे वडील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली. मात्र, हा व्यवहार रद्द करण्यासाठी बुडवलेले मुद्रांक शुल्क आणि त्यावरील दंड असे ४२ कोटी रुपये भरावे लागतील, अशी नोटीस नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने 'अमेडिया'ला बजावली आहे. या पार्श्वभूमीवर, बावनकुळे यांनी, 'व्यवहार रद्द करण्यात येत असेल, तर ४२ कोटी रुपयांची नोटीस कशाला, याचा तपास करावा लागेल,' असे वक्तव्य केले .भाजपच्या शहर कार्यालयात महसूलमंत्री बावनकुळे बुधवारी आले होते. त्या वेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने खरेदी केलेल्या वादग्रस्त जमीन प्रकरणावर भाष्य केले. ते म्हणाले, 'हा सरकारी जागेचा व्यवहार आहे. नोटिशीमधून जे ४२ कोटी येणार आहेत, ते नेमके कशाचे आहेत, ते मला तपासावे लागेल.

कारण, आपण व्यवहार रद्द करतो आहोत. व्यवहार रद्द करताना ४२ कोटी का घ्यायचे, त्यासाठी नोटीस का दिली गेली, हेही तपासावे लागेल.'जमिनीच्या खरेदी-विक्रीमध्ये प्रथमदर्शनी दोषी दिसणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नेमली आहे. या समितीला एका महिन्यात अहवाल देण्याच्या सूचना केल्या आहेत. हा अहवाल आल्यानंतर सर्व गोष्टी स्पष्ट होतील. यामध्ये आणखी कोणी दोषी आढळले, तर त्यांच्यावरही कारवाई होईल. अहवाल येण्यापूर्वी त्यावर भाष्य करणे म्हणजे तपासाला बाधा पोहोचविण्यासारखे आहे. या प्रकरणाचा तपास कोणत्याही दबावाखाली न होता नि:पक्षपातीपणे होईल,' असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.दरम्यान, मुंढवा जमीन गैरव्यवहारात गुन्हा दाखल झालेल्या शीतल तेजवानी न्यायालयात गेल्या आहेत, यावर बावनकुळे म्हणाले, 'हे प्रकरण सरकारी मालमत्तेच्या खरेदी-विक्रीचे आहे. त्यामुळे राज्य सरकार न्यायालयात योग्य ती बाजू मांडेल.''माहिती अधिकार कार्यकर्त्या अंजली दमानिया त्यांच्या शिष्टमंडळासह भेटण्यासाठी आल्या होत्या. या प्रकरणाबाबत त्यांच्याकडे असलेले पुरावे चौकशी समितीसमोर मांडणार आहे. ही चौकशी पूर्ण झाल्यानंतर सर्व काही समोर येईल आणि योग्य कारवाई होईल,' असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.'बोपोडी येथील जमीन खरेदी प्रकरणाची चौकशी महसूल विभाग आणि पोलीस स्वतंत्रपणे करीत आहेत. या प्रकरणामध्ये लिहून देणार किंवा लिहून घेणार म्हणून पार्थ पवार यांच्या कुठेही सह्या नाहीत. या चौकशीमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे,' असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी नमूद केले.पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने मुंढव्यातील महार वतनाची जागा खरेदी केल्याच्या व्यवहारात गैरप्रकार झाल्याच्या आरोपांचे मोहोळ उठल्यानंतर हा करारच रद्द करण्यात येईल, अशी भूमिका पार्थ यांचे वडील उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतली.

# फॉर्च्युनरमध्ये मित्राच्या हत्येचा थरार

## मित्रांनी जवळून डोक्यात गोळी झाडली; अद्याप कारण समोर आलं नाही

। पुणे ।

**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**मित्राने मित्राची डोक्यात गोळी झाडून हत्या केली आहे. ही घटना आळंदी दिघी रोडवर घडली आहे. नितीन गिलबिले चा जागीच मृत्यू झाला आहे. संशयित आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर चा शोध दिघी पोलीस घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी सहा च्या सुमारास मयत नितीन गिलबिले, अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर हे आळंदी दिघी रस्त्याच्या कडेला चारचाकी गाडी लावून आत बसले होते.**



### आळंदी दिघी रोडवर घटना

आणि गुन्हे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांनी धाव घेतली होती. अद्याप हत्येच कारण समजू शकलेले नाही. अधिक पोलीस तपास करत आहेत.मित्राने मित्राची डोक्यात गोळी झाडून हत्या केली आहे. ही घटना आळंदी दिघी रोडवर घडली आहे. नितीन गिलबिले चा जागीच मृत्यू झाला आहे. संशयित आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर चा शोध दिघी पोलीस घेत आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी सहा च्या सुमारास मयत नितीन गिलबिले, अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर हे आळंदी दिघी रस्त्याच्या कडेला चारचाकी गाडी लावून आत बसले होते.

अमित पठारे आणि विक्रांतने त्याच्या जवळील पिस्तुल काढून नितीन गिलबिलेच्या डोक्यात गोळी झाडली.यात नितीन चा जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना सायंकाळी सहाच्या सुमारास घडली असून संशयित आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर पसार झाले असून त्यांचा शोध दिघी पोलीस घेत आहेत. घटनास्थळी दिघी पोलीस आणि गुन्हे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांनी धाव घेतली होती. अद्याप हत्येच कारण समजू शकलेले नाही. अधिक पोलीस तपास करत आहेत.मित्राने मित्राची डोक्यात गोळी झाडून हत्या केली आहे. ही घटना आळंदी दिघी रोडवर घडली आहे. नितीन गिलबिले चा जागीच मृत्यू झाला आहे. संशयित आरोपी अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर चा शोध दिघी पोलीस घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी सहा च्या सुमारास मयत नितीन गिलबिले, अमित पठारे आणि विक्रांत ठाकूर हे आळंदी दिघी रस्त्याच्या कडेला चारचाकी गाडी लावून आत बसले होते. ते एकमेकांसोबत गप्पा मारत होते. पैकी, अमित पठारे आणि विक्रांतने त्याच्या जवळील पिस्तुल काढून नितीन गिलबिलेच्या डोक्यात गोळी झाडली.

## मिशन PCMC : भोसरी मतदार संघात भाजपाच्या जागा वाढणार

# प्रभाग आरक्षण सोडतीमध्ये भाजपाचे “गुडलक”!

## पिंपरी-चिंचवडमधील भाजपाची दुसऱ्या टप्प्यावर आघाडी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड । विशेष प्रतिनिधी : पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने मंगळवारी प्रभाग आरक्षण सोडत जाहीर केली. या निवडणुकीचा पहिला टप्पा म्हणजे प्रभाग रचना... आणि त्यामध्ये भाजपाने आपले सोईचे प्रभाग करुन घेतले आहेत, असा दावा करण्यात आला होता. त्यावर हरकती आणि सूचनाही घेण्यात आल्या. मात्र, निवडणूक विभागाने त्याची फारशी दखल घेतली नाही. त्यानंतर आता आरक्षण सोडतीमध्येसुद्धा भाजपाचे ‘गुडलक’ दिसून आले.**



पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक तब्बल 9 वर्षांनंतर ही निवडणूक होणार आहे. 2017 मध्ये 128 पैकी 77 नगरसेवक भाजपाच्या तिकिटावर निवडून आले होते. त्यानंतर 2019 आणि 2024 मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने शहरातील पकड आणखी मजबूत केली. त्यामुळे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाला अस्थित्व टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये भारतीय जनता पार्टी आजच्या घडीला सर्वाधिक बलाढ्य आहे. राज्यात आणि केंद्रात सत्तेत असल्यामुळे भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाच्या स्थानिक नेत्यांनी प्रभाग रचनेवर अप्रत्यक्ष ‘कंट्रोल’ ठेवला. त्यानंतर झालेल्या आरक्षण सोडतीमध्ये भाजपाचे बहुसंख्य प्रभाग ‘सेफ’ झाले आहेत. किंबहुना, “देवाच्या काठीचा आवाज होत नाही” या म्हणीप्रमाणे काही उपद्रवी उमेदवारांचा पत्ता आपोआप कट झाला आहे.

पिंपरीचे आमदार आणि विधानसभा उपाध्यक्ष आण्णा बनसोडे यांचे पुत्र सिद्धार्थ बनसोडे तीव्र इच्छुक होते. मात्र, प्रभाग 19 मधील जागा महिलांसाडी राखीव झाली आहे. त्यामुळे त्यांना अन्य ठिकाणी उमेदवारीची चाचपणी करावी लागणार आहे. शहराच्या राजकारणात कायम चर्चेत असलेल्या सीमा सावळे, सुलक्षणा शिलवंत, चंद्रकांत सोनकांबळे यांच्यासह अश्विनी वाघमारे, कमल घोलप, अश्विनी बोबडे, गिता मंचरकर, शारदा सोनवणे, माधुरी राजापुरे यांच्या प्रभागांमध्ये पुरूषांचे आरक्षण पडले आहे. मंगला कदम आणि यशोदा बोईनवाड यांच्या प्रभागात ओबीसी आरक्षण पडले आहे. त्यामुळे त्यांना खुल्या गटातून लढावे लागणार आहे. शाहुनगर-संभाजीनगरमध्ये ओबीसी महिला आरक्षण पडल्यामुळे केशव घोळवे यांची अडचण झाली आहे. विशेष म्हणजे, 2017 मध्ये अनुसूचित जातीच्या आरक्षीत जागेवर निवडून आलेल्या 5 इच्छुक दावेदारांना आता घरी बसावे लागणार आहे.

प्रभाग 30 मध्ये सर्व जागा आरक्षित झाल्यामुळे या प्रभागात खुल्या गटातील इच्छुकांची कोंडी होणार आहे. ओबीसी जागा महिलांसाठी राखीव नाही. त्यामुळे नगरसेविका आशा शेंडगे यांची कोंडी झाली आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघाअंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या 12 प्रभागांमध्ये झालेल्या आरक्षण सोडती भाजपासाठी ‘पॉझिटिव्ह’ आहेत. तळवडे गाव प्रभागामध्ये प्रभाग रचनेत ताम्हाणे वस्तीचा भाग तोडण्यात आला. त्यामुळे राष्ट्रवादीचे पंकज भालेकर यांचे पॅनेल डिस्टर्ब झाले आहे. त्यांना पॅनेल पूर्ण करण्यासाठी कसरत करावी लागणार आहे. प्रभाग- 1 मध्ये यश साने आणि विकास साने लढणार आहेत. तसेच, प्रभाग 12 मधून या प्रभागात आलेल्या संगीता ताम्हाणे असे तीन इच्छुक आहेत. त्या ठिकाणी अन्य स्थानिक इच्छुकांची संख्या जास्त आहे. मग, संधी कोणाला मिळणार? असा प्रश्न आहे. प्रभाग क्रमांक 2 मध्ये राष्ट्रवादीचे वसंत बोराटे एकाकी झाले आहेत. कारण, या ठिकाणी राष्ट्रवादीकडून इच्छुक प्रा. कविता आल्हाट, रुपाली आल्हाट, आतिष बारणे, विशाल आहेर असे इच्छुक आहेत. पक्षाकडून दिलेला उमेदवार आणि वसंत बोराटे यांना अपेक्षीत असलेला उमेदवार यामध्ये मतभिन्नता आहे. प्रभाग 3 मध्ये एससी आरक्षण पडले आहे. इच्छुकांची संख्या जास्त आहे. प्रभाग- 4 मध्ये गायकवाड-घुले भाजपासोबत आहेत. राष्ट्रवादीचे पॅनेल सक्षम नाही. प्रभाग- 5 हा अजित गव्हाणे यांचा स्वत:चा प्रभाग आहे. या ठिकाणी पॅनेल सक्षम करण्यासाठी कसरत करावी लागणार आहे. प्रभाग- 6 मध्ये रवि लांडगे यांची भूमिका स्पष्ट नाही. प्रभाग- 7 मध्ये पॅनेल पूर्ण होत नाही. प्रभाग- 8 मध्ये एकच ओपन पुरूष आहे. त्यामुळे विक्रांत लांडे किंवा राजेंद्र वाबळे यांपैकी एकाला माघार घ्यावी लागणार आहे. सीमा सावळे यांना पुरुष गटातून लढावे लागणार आहे. प्रभाग- 9 मध्ये एससी खुला झाला आहे. त्यामुळे राहुल भोसले आणि समीर मासुळकर यांना एकमेकांसमोर लढावे लागेल किंवा महिला उमेदवार द्यावा लागणार आहे. प्रभाग- 11 मध्ये एससी पुरूष झाल्यामुळे कंदन गायकवाड यांना संधी मिळाली आणि निलेश नेवाळे सक्षम उमेदवार आहेत. राष्ट्रवादीच्या संजय नेवाळे किंवा सचिन सानप यांच्यासाठी सोपी लढाई नाही. प्रभाग- 13 मध्ये भाजपाकडून उत्तम केंदळे आणि बापू घोलप उमेदवार आहेत. शिवसेना शिंदे गटाला एक जागा सुलभा उबाळे सोडू शकते. त्यामुळे या प्रभागात तडजोडीचे राजकारण न करता एकमेकांसमोर लढावे लागणार आहे. काही पक्षप्रवेश झाले, तर राष्ट्रवादी किंवा विरोधी पक्षाकडे सक्षम उमेदवार नाहीत.


### भाजपाची सत्ता पुन्हा येईल

महापालिका निवडणूक प्रभाग रचना आणि त्यानंतर झालेली आरक्षण सोडत याच्यामध्ये भोसरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी घायाळ झाली आहे. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्त्वात काही महत्त्वाचे पक्षप्रवेश होणार आहेत. भोसरी मतदार संघात झालेली प्रभाग रचना आणि आरक्षण यांचे ‘गुडलक’ भाजपाकडे आहे. त्यामुळे भाजपाकडे इच्छुकांची मांदियाळी, तर राष्ट्रवादीकडे सक्षम उमेदवारांची वानवा आहे. त्यामुळे 2017 मध्ये मतदार संघात 48 पैकी 33 जागा मिळवलेल्या भाजपाकडे या निवडणुकीत जागा वाढतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे. 2017 प्रमाणे झालेली प्रभाग रचना, भाजपातील इच्छुकांच्या मनासारखे आरक्षण आणि उमेदवारांची मांदियाळी पाहता आजच्या घडीला पिंपरी-चिंचवड महापालिकेत भाजपाची सत्ता पुन्हा येईल, असे स्पष्ट मत राजकीय जाणकार समाजमांध्यमांवर मांडताना दिसत आहेत.

# पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचे मनोमिलन!

## महापालिका निवडणुकांसाठी पिंपरी चिंचवडमध्ये दोन्ही राष्ट्रवादी एकत्र ?

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



राज्यात भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या महायुतीचे सरकार असले तरीही पिंपरी-चिंचवड शहरात आगामी महापालिका निवडणुकीसाठी वेगळीच समीकरण जुळली जात आहेत. शहरात दोन्ही राष्ट्रवादीचे काका-पुतण्या एकत्र येत आहेत. याबाबत वरिष्ठ पातळीवर राजकीय हालचालींना वेग आला असून खासदार सुप्रिया सुळेंनी एकत्र येण्याचा प्रस्ताव दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. दरम्यान, शहरातील राजकारण नव्या वळणावर आले असून पुन्हा एकदा पारंपारिक शत्रू असलेल्या भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जोरदार लढाई होणार आहे.

राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये फूट पडून राष्ट्रवादी कॉंग्रेसचा अजित पवार गट महायुतीच्या माध्यमातून सत्तेत सहभागी झाला. आता आगामी महापालिका निवडणुकीसाठी पिंपरी-चिंचवड शहरामध्ये हे दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याचे संकेत मिळत आहेत. त्यासाठी वरिष्ठ पातळीवर हालचालींना वेग आला असून राज्यातील नेत्यांमध्ये खलबते सुरु आहेत. तसेच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्यासाठी स्थानिक पातळीवरील पदाधिकारी, कार्यकर्ते देखील त्यासाठी आग्रही असल्याचे संकेत दिले जात आहेत. पिंपरी-चिंचवड शहर हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीच शहराचा कायापालट करत विकास कामे केली.

> “ आमच्या पक्षामध्ये फूट पडली तर त्याचा फायदा विरोधकांना होत आहे. अजित पवार हे आमचे स्फूर्तीस्थान आहेत. तर शरद पवार हे आमचे दैवत आहेत. हे दोन्ही पक्ष एकत्र येण्याबाबत हालचाली सुरू झाल्या आहेत. भाजपासोबत महायुतीमध्ये आम्ही लढण्यास तयार नाही. आम्ही स्वबळावर तयारी केली आहे. त्यातच आमच्यासोबत शरद पवार गट आला तर आम्हाला आनंदच होणार आहे. त्यासाठी पक्षाच्या वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहेत. याबाबत अलीकडेच आमदार रोहित पवार यांनी देखील भूमिका मांडली आहे. गेल्या नऊ वर्षातील भाजपाचा कारभार पाहता शहराला विकासाकडे नेण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादीने एकत्र येण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने प्रयत्न सुरू असून पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये महापौर हा राष्ट्रवादी काँग्रेसचा होईल.
>
> **-योगेश बहल,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)


> “ भाजपाला हरविण्यासाठी महाविकास आघाडीमध्ये शाहू, फुले, आंबेडकर विचारधारेचे पक्ष, संघटना सहभागी होणार असतील तर त्यांचे स्वागतच आहे. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र होण्याबाबत वरिष्ठ नेते निर्णय घेतील. ते जो निर्णय घेतील त्यासोबत आम्ही कायम असू.
>
> **-तुषार कामठे,**
> शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष




# देशात ‘मतदान सक्तीचे’?

**मतदानाची टक्केवारी दिवसेंदिवस घटत चालली आहे. ही बाब जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत देशासाठी एकप्रकारे लाजीरवाणी म्हणावी अशी असली तरी अलिकडच्या काळात देशातील राजकारणाचा घसरलेला दर्जा, राजकीय पक्षांवरील जनतेचा उडालेला विश्वास आणि उदासिनता ही प्रमुख कारणे त्यासाठी सांगता येतील.**

त्यामुळे राजकारणाचा दर्जा सांभाळण्यासोबतच नागरिकांमधील उदासिनता दूर करण्यासाठी सरकारला पावले उचलण्याची आणि लोकशाहीचा हक्क म्हणून मतदान सक्तीचे करण्याची गरज निर्माण झाली आहे. हजारो जणांनी प्राणाची आहुती दिल्यानंतर आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून उणीपुरी पंच्चाहत्तर वर्षे झाली. देश स्वातंत्र झाला, तेव्हा साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प होते. शिक्षणाच्या सोयी- सुविधाही फारश्या नव्हत्या. पंचवार्षिक योजनेच्या अंतर्गत शिक्षणासाठी भरघोस तरतुदी करण्यात आल्या. आज देशातील चारदोन राज्ये सोडली तर साक्षरतेचे प्रमाण समाधानकारकरित्या वाढले आहे. ‘औद्योगिक क्रांती’ ‘हरित क्रांती’ फलस्वरूप होऊन, पारतंत्र्यात उपासमार सोसणाऱ्या भारतीयांच्या पोटाला दोन वेळचे अन्न मिळू लागले. हरित क्रांतीचे पीक रानारानात तरारले. देश अन्नधान्याबाबतीत स्वयंपूर्ण झाला. औद्योगिकवाढीचे चक्र देशभर फिरू लागले आणि आर्थिक प्रगतीची फळे देशभर



दिसू लागली. दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध झाल्या. व्यापार उदिमांची भरभराट झाली. त्यातच संगणक युगाने जोराची मुसंडी मारली. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर देशाने आर्थिक प्रगतीची झेप घेतली. मात्र प्रगतीची ही फळे सर्वांना सारख्या प्रमाणात मिळाली नाहीत. ज्यांना शिक्षणाची संधी मिळाली, ती काही मोजकी मंडळी शिकली, त्यांचीच नोकरी-उद्योगधंद्याद्वारे प्रगती झाली. थोडी मूठभर मंडळी, मध्यमवर्ग, उच्च मध्यमवर्ग, व्यापारी, कारखानदार आणि शेअर मार्केटचा जुगार खेळून श्रीमंत झाली. अचानक श्रीमंत झालेली मंडळी चंगळवादाकडे वळली, पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करू लागली. ‘आम्ही कर भरतो म्हणजे देशावर आणि देशवासीयांवर महान उपकार करतो’ अशी सोईस्कर समजूत करून ही मंडळी आज समाजात वावरताना दिसत आहेत. शिक्षित चंगळवादी मंडळी भरल्यापोटी कारखान्यात, कार्यालयात, रेल्वेत, मोटारीत, रस्त्यावर, पार्टीत, क्लबमध्ये ‘भ्रष्टाचार किती बोकाळलाय,’ ‘राजकारणी कसे हरामखोर आहेत’, ‘लोकशाहीची कशी वाट लागलीय’, या विषयांवर ‘प्याले’रिचवीत पोटतिडकीने पोपटपंची करताना आढळतात. ही मंडळी सर्व चर्चा करताना आपण स्वतःला सोडून इतरांबद्दलच बोलत राहतात. लोकशाही, राजकारण, सामाजिक बांधिलकी अशा विषयांवर सवंग चर्चा करणारे हे सर्व बुद्धिवादी ‘चर्चील’ नेमक्या निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी मतदान करायचे सोडून पिकनिक स्पॉटवर जाऊन पिता-पिता पुन्हा चर्चेचा आनंद घेताना आढळतात. देशाचा एक सुबुद्ध नागरिक म्हणून आपण मतदान न करून राष्ट्रीय कर्तव्यात कसूर करीत आहोत याची जरासुद्धा खंत या तथाकथित बुद्धिवादी बडबडणाऱ्यांना वाटत नाही, हे या देशाचे खरे दुर्दैव आहे. ग्रामीण भागात कष्ट करणारी, डोंगरदऱ्यात दुर्गम भागात राबणारी गोरगरीब जनता, कामधंदा सोडून, प्रसंगी प्रवासखर्चासाठी पदरमोड करून मतदानाचे ‘पवित्र कर्तव्य’पार पाडताना आढळते. खेड्यापाड्यात अगदी दुर्गम भागातही ७० ते ८० टक्के मतदान होताना आढळते मात्र लोकशाहीची शेलकी फळे चाखलेली आणि लोडशेडिंगची झळ न पोहचलेली शहरातील ही सुखासीन शाहणी, शहाजोग मंडळी, ‘कसले मतदान करायचे’ म्हणत मतदान केंद्राकडे तुच्छतेने पाठ फिरविताना आढळतात. त्यामुळे मोठ्या शहरात जेमतेम ३४ ते ४५ टक्केच मतदान होते ,त्यामुळे ‘लायक’ माणसे निवडून येत नाहीत. परिणामी प्राणांची आहुती देऊन मिळवलेल्या या स्वातंत्र्याचे ‘मातेरे’ होत आहे. देश आता पच्चाहत्तरीचा झाला आहे. ज्येष्ठांच्या पंगतीत बसला आहे आणि म्हणूनच घटनाकर्त्यांची लोकशाहीची धारणा पूर्ण करण्यासाठी प्राप्त परिस्थितीत, देशातील ज्येष्ठ विचारवंतांनी, कायदेपंडितांनी, समाजधुरिणांनी आणि प्रामाणिक पुढाऱ्यांनीही ‘मतदान सक्तीचे’ करण्यासंबंधी आवश्यक ती कायदेशीर तरतूद करण्यासाठी त्वरित पावले उचलण्याची खरी काळाची गरज आहेकारवाईला सामोरे जावे लागले तर हे सर्व तथाकथित शिक्षित, शहाणे, ‘चर्चील’निमूटपणे मतदान केंद्राची वाट चालू लागतील आणि लोकशाहीचा गाडाही वेगाने धावू लागेल.

## प्रासंगिक »

### बुद्धिवंतांचे ब्रेनवॉश!

***संगणक क्षेत्रातील अभियंत्यांस बाबा/बापूची गरज वाटत असेल आणि डॉक्टरांस दहशतवादाचा आसरा घ्यावा लागत असेल तर उभयतांच्या शिक्षणाबाबत गंभीर प्रश्न निर्माण होतात...***

दिल्लीतील बॉम्बस्फोट कटात काही वैद्याकांचा समावेश असल्याचे उघडकीस आल्याने अनेकांस आश्चर्याचा धक्का बसल्याचे दिसते. या धक्क्याचे दोन भाग. एका गटास बसलेला धक्का डॉक्टर असे कसे काय करू शकतो, असा. त्यास सर्वसाधारण म्हणता येईल. ज्यांनी प्राण वाचवायचे तेच प्राण घेण्याचा विचार कसा काय करू शकतात वगैरे भावना या गटांत व्यक्त होते. ते योग्यती वेगळी आहे. ‘त्यांच्या’त डॉक्टरही किती कट्टर असतात पाहा, अशा सुरात ती व्यक्त होते. डॉक्टर आपले आणि ‘त्यांचे’ अशी वर्गवारी करण्यासाठी या गटात जोमाने प्रयत्न सुरू झालेले दिसतात. ते सध्याच्या ‘ते’ आणि ‘आम्ही’ या अशी विभागणी करण्याच्या प्रथेशी सुसंगत म्हणता येईल. या दुसऱ्या वर्गातील प्रतिक्रियाधारकांस डॉ. सुदाम मुंडे या कुख्यात वैद्याकाचे स्मरण या प्रसंगी करून देणे त्यांच्या वर्गवारी-मानसिकतेवर उतारा ठरावे.

जम्मू आणि काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यात दहशतवाद्यांनी भारतीय हवाई दलाच्या वाहनांवर गोळीबार केला. या दहशतवादी हल्ल्यात पाच जवान जखमी झाले, त्यापैकी एकाला हौतात्म्य आले. राजौरी आणि पूंछ जिल्ह्यांमध्ये पसरलेल्या पीर पंजाल भागात गेल्या पंधरवड्यात, २२ एप्रिल व २८ एप्रिल रोजीही दहशतवादी हल्ले घडले होते.

## हल्ले होणार नाहीत, असे उपाय हवे

पण त्यांचे लक्ष्य स्थानिक अधिकारी अथवा कर्मचारी हे होते. आपल्या देशात चालू असलेल्या लोकशाही प्रक्रियेला बाधा आणण्याच्या प्रयत्नाला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी आपले हवाई दल सक्षम आहेच. पण २०२१ पासून सुरू झालेल्या घटनांमध्ये आतापर्यंत २१ जवानांचा बळी गेला आहे आणि अनेक जवान जखमी झाले आहेत. भरून न येणारे हे मोठे नुकसान कसे कमी करता येईल यासाठी कायमस्वरूपी उपाय केले पाहिजेत. कर्नाटकचे विद्यामान खासदार प्रज्ज्वल रेवण्णा यांनी महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे ध्वनिचित्रमुद्रण उपलब्ध आहे. तरीही सीतारामन यांनी ‘विरोधक याचे राजकारण करत आहेत,’ असे म्हणणे दुर्दैवी आहे. यात कसले राजकारण आहे, हे सीतारामन यांनीच सांगावे. महिलांवरील लैंगिक अत्याचार ही दुर्लक्ष करण्यासारखी बाब नसून, तो अक्षम्य गुन्हा आहे. कुस्ती प्रशिक्षक ब्रजभूषण सिंह असो प्रज्ज्वल रेवण्णा, सारे एकाच माळेचे मणी ठरतात. त्यातही भाजपच्या



कोणीही गुन्हा करावा, सरकार नेहमीच त्यांना पाठीशी घालत आले आहे- याउलट विरोधकांनी कोणताही गुन्हा केला की, त्यांच्याविरुद्ध तत्परतेने कारवाई करून, त्यांना तुरुंगात टाकायचे, यातून ‘कायद्यापुढे सारे समान’ या घटनात्मक तत्त्वाचे काय पालन होते? हासुद्धा गोबेल्स नीतीचाच भाग नाही का? कारण यापूर्वी या सदरात लेखक विशेषत: अर्थविषयक प्रश्नांविषयी मत मांडत. जीएसटीवर टीका-टिप्पणी करणे, हा तर त्यांचा आवडता विषय. परंतु याविषयीच्या ताज्या वृत्तांकडे त्यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. एप्रिल २०२४ मधील जीएसटी महसूल संकलन आतापर्यंतचे सर्वाधिक २.१० लाख कोटी रुपये आहे, त्यातही पाच-सहा छोट्या राज्यांची अल्पशी घट वगळता उर्वरित राज्यांची महसुली उत्पन्न २५ टक्क्यांच्या पुढेच आहे. या पद्धतीने महसूल संकलन होत राहिल्यास सरकारच्या एकूण महसुलात जीएसटीचा वाटा ४० टक्क्यांच्या आसपास राहिला आहे. गेल्या दोन-तीन वर्षांच्या शेअर बाजारातील चढता क्रमसुद्धा देशाच्या अर्थव्यवस्थेतील आत्मविश्वास वाढवत आहे. एवढे सारे वास्तववादी असूनदेखील, लेखक या वृत्तांची दखल न घेता, केवळ जाहीरनाम्यावर चार चार लेख लिहीत असतील तर हासुद्धा एक प्रकारे गोबेल्स नीतीचाच भाग असू शकतो.भाजपचा अभिमान’ हा ‘समोरच्या बाकावरून’मधील लेख वाचून खूपच मनोरंजन झाले. अल्पसंख्याक लांगूलचालनासाठी जगप्रसिद्ध असणाऱ्या काँग्रेसने आम्ही ‘मुस्लीम’ हा शब्दच वापरला नाही म्हणणे म्हणजे जणू जनतेला अल्पसंख्याक म्हणजे कोण ते माहीतच नसल्यासारखे बोलणे होय.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक: काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भूमिका

# महायुतीशी आघाडी नाही!

### आतापर्यंत १५ जिल्ह्यांचा आढावा

### उद्या तिकीटवाटप पूर्ण करणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काही ठिकाणी वंचित बहुजन आघाडी, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राजेंद्र गवई यांचा आरपीआय, महादेव जानकर यांचा रासप तसेच शेतकरी संघटनांशी चर्चा सुरू आहे. या संघटना आणि पक्षांशी आमची आघाडी होईल. आमचा लढा भाजपशी असेल. त्यामुळे महायुतीतील कोणत्याही पक्षाशी काँग्रेस पक्ष आघाडी करणार नाही, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले.**



उमेदवारी अंतिम झालेल्या उमेदवारांना गुरुवारी एबी फॉर्म देण्यात येतील, अशी माहिती सपकाळ यांनी दिली.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ऑनलाईनऐवजी केवळ ऑफलाईन करावी, अशी मागणी काँग्रेसने राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे.

राज्यातील जिल्हाध्यक्ष, निरीक्षकांच्या आजच्या बैठकीत अर्जदारांची संख्या किती, किती जणांची मागणी आहे, जिल्हा समितीच्या शिफारशी काय आहेत, याअनुषंगाने आढावा घेण्यात आला. आतापर्यंत १५ जिल्ह्यांचा आढावा घेतला. अर्जांची संख्या मोठी असल्याने गुरुवारी दुपारपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहणार आहे.काही ठिकाणी आम्ही स्वबळावर लढत आहोत. तर कुठे आघाडी केली जाणार आहे. तिकिटवाटपाची प्रक्रिया उद्या गुरुवारी संध्याकाळपर्यंत पूर्ण करणार आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागातील उमेदवारांबाबत चर्चा झाली आहे. उमेदवारी अंतिम झालेल्या उमेदवारांना गुरुवारी एबी फॉर्म देण्यात येतील, अशी माहिती सपकाळ यांनी दिली.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया ऑनलाईनऐवजी केवळ ऑफलाईन करावी, अशी मागणी काँग्रेसने राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. मतदार याद्यांमध्ये घोळ आणि अर्ज भरताना काटेकोरपणा हे षडयंत्र आहे का, अशी शंका येत असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.विधानसभा आणि लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज लहान असतो. मात्र, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा उमेदवारी अर्ज २५ पानांचा आहे. त्यामुळे अर्ज भरताना उमेदवारांची दमछाक होत आहे. तो भरून ऑनलाईन अपलोड केल्यानंतर तो नंतर ऑफलाईनही सादर करावा लागतो.

त्यामुळे ही प्रक्रिया ऑफलाईन करा, अशी मागणी काँग्रेसने विधानपरिषदेतील गटनेते सतेज पाटील, विजय वडेट्टीवार यांच्या सहीने आयोगाला दिलेल्या पत्रात केली आहे.उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेवर नाराजी व्यक्त केली. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. हा उमेदवारी अर्ज २५ पानांचा आहे. ऑनलाईन अर्ज भरताना अनेक भागात इंटरनेट, सर्व्हर डाऊनच्या अडचणी येतात. त्यामुळे विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीला ज्यापद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया असते, तशीच सोपी पद्धत असावी. उमेदवारी अर्ज ऑफलाईन पद्धतीने भरण्याचीही मुभा द्यावी, अशी मागणी सपकाळ यांनी केली

.स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत काही ठिकाणी वंचित बहुजन आघाडी, स्वाभिमानी शेतकरी संघटना, राजेंद्र गवई यांचा आरपीआय, महादेव जानकर यांचा रासप तसेच शेतकरी संघटनांशी चर्चा सुरू आहे. या संघटना आणि पक्षांशी आमची आघाडी होईल. आमचा लढा भाजपशी असेल. त्यामुळे महायुतीतील कोणत्याही पक्षाशी काँग्रेस पक्ष आघाडी करणार नाही, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले.

राज्यातील जिल्हाध्यक्ष, निरीक्षकांच्या आजच्या बैठकीत अर्जदारांची संख्या किती, किती जणांची मागणी आहे, जिल्हा समितीच्या शिफारशी काय आहेत, याअनुषंगाने आढावा घेण्यात आला. आतापर्यंत १५ जिल्ह्यांचा आढावा घेतला. अर्जांची संख्या मोठी असल्याने गुरुवारी दुपारपर्यंत ही प्रक्रिया सुरू राहणार आहे.तर कुठे आघाडी केली जाणार आहे. तिकिटवाटपाची प्रक्रिया उद्या गुरुवारी संध्याकाळपर्यंत पूर्ण करणार आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागातील उमेदवारांबाबत चर्चा झाली आहे.

# कराड पालिकेत महायुतीमध्ये तिढा

## महायुतीचा मेळ अशक्य;नगराध्यक्षपद भाजपकडेच – डॉ. अतुल भोसले

### सर्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कराड नगरपालिकेचा गतखेपेचा नगराध्यक्ष भाजपचाच निवडून आल्याने या पदावर स्वाभाविकपणे आमचा दावा असून, नगराध्यक्षपदासाठी कोणतीही तडजोड नसल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष, आमदार डॉ. अतुल भोसले यांनी ठणकावून सांगितले. मित्रपक्षांसह सर्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. पण, तशी शक्यता दिसत नसल्याची खंत त्यांनी बोलून दाखवली.**



कराड नगरपालिकेचा गतखेपेचा नगराध्यक्ष भाजपचाच निवडून आल्याने या पदावर स्वाभाविकपणे आमचा दावा असून, नगराध्यक्षपदासाठी कोणतीही तडजोड नसल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष, आमदार डॉ. अतुल भोसले यांनी ठणकावून सांगितले. मित्रपक्षांसह सर्वांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला.

भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. भाजप प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, शहराध्यक्ष सुषमा लोखंडे, माजी नगराध्यक्ष शारदा जाधव, जयवंत पाटील, रोहिणी शिंदे, माजी उपनगराध्यक्ष विनायक पावसकर, सुभाष डुबल, अरुण जाधव आदींची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. भोसले म्हणाले, 'महायुती'चा मेळ घालण्याचा प्रयत्न करतोय. त्यात, मित्रपक्षांसह सर्वांनी एकत्रितपणे निवडणूक लढवावी, हाच हेतू आहे. परंतु, तसे होईल याची शक्यता वाटत नाही. तरी, काहीही होवो, नगराध्यक्षपदासाठी भाजप कोणतीही तडजोड करणार नाही. मात्र, इतर जागांवर आवश्यक तेथे समन्वयाचा मार्ग काढता येईल, अशी सबुरीची भूमिकाही त्यांनी व्यक्त केली.भाजपकडे नगराध्यक्षपदासाठी १६ इच्छुक आहेत. त्यात ज्येष्ठ नगरसेवक विनायक पावसकर, माजी नगराध्यक्ष शारदा जाधव, जयवंत पाटील, अरुण जाधव आदींचा समावेश आहे. परंतु, सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊनच निर्णय होईल. मुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्ष आणि मुख्य समितीचा निर्णय अंतिम असेल, असे डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले.सदस्यपदाच्या ३१ जागांसाठी पक्षाकडे १०४ जणांनी मुलाखती दिल्या. बहुतेक प्रभागात अनेक प्रबळ नेत्यांनी उमेदवारी मागितल्याने माझी अडचण झाल्याचे मान्य करत, उमेदवारी न मिळालेल्या इच्छुकांनी नाराजी झटकून, पक्षासाठी एकदिलाने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. भाजप हा निष्ठा अन् नेटाने काम करणाऱ्यांचा उचित सन्मान करणारा, कार्यकर्त्यांना त्यांच्या प्रामाणिकपणाचे फळ देणारा, देशातीलच नव्हेतर, जगातील सर्वांत मोठा पक्ष असल्याचा विश्वास देताना, नाराजी नको, निष्ठेने काम करा, असे कळकळीचे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.बनवून या शहराला आवश्यक व प्रगत सेवा- सुविधा देवून देशात अव्वल बनवायचे असल्याचा संकल्प डॉ. अतुल भोसले यांनी बोलून दाखवला.

## पाचशे जणांची चौकशी

## दहशतवाद्यांविरोधातील मोहीम आणखी तीव्र

# काश्मीरमध्ये तीनशेहून अधिक ठिकाणी छापे

## काश्मीरमध्ये आक्षेपार्ह साहित्य जप्त

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमध्ये बुधवारी पोलिसांनी दहशतवाद्यांविरोधातील मोहीम आणखी तीव्र केली. बंदी घातलेल्या जमात-ए-इस्लामी संघटनेशी संबंध असलेल्या संशयावरून पोलिसांनी तीनशे ठिकाणी छापे टाकले.**



जमात-ए-इस्लामी वेगळे नाव धारण करून काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी कारवाया सुरू करणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी हे छापे टाकले. कुलगाम, पुलवामा, शोपियाँ, बारामुल्ला आणि गांदरबल जिल्ह्यात हे छापे टाकण्यात आले. दहशतवाद्यांचे जाळे उद्ध्वस्त करण्याच्या मोहिमेचा हा भाग असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी सांगितले, की दक्षिण काश्मीरमध्ये कुलगाम जिल्ह्यात दोनशे ठिकाणी छापे टाकले. गेल्या चार दिवसांत चारशेहून अधिक वेळा शोधमोहिमा विविध ठिकाणी हाती घेण्यात आल्या. पाचशे जणांची चौकशी करण्यात आली. संशयित साहित्य जप्त करण्यात आले. बारामुल्लामध्ये ३०हून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले. इतर जिल्ह्यांतही पोलिसांची कारवाई सुरू आहे.आसाममध्ये दिल्ली स्फोटाशी संबंधित प्रक्षोभक मजकूर सामाजिक माध्यमावर पोस्ट केल्यामुळे पाच जणांना अटक करण्यात आली.मुख्यमंत्री हिमंता बिस्व शर्मा यांनी बुधवारी ही माहिती दिली. सामाजिक माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यावर तातडीने कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.लखनौ/कानपूर: दहशतवाद्यांशी संबंध असलेल्या आरोपांवरून अटक करण्यात आलेल्या डॉ. शाहीन सईदच्या भाऊ महंमद शोएब तिच्या अटकेवरून आश्चर्य व्यक्त केले आहे. 'डॉ. शाहीन अशा बेकायदा कृत्यांत सहभागी असेल, हे स्वीकारण्यास आम्हा सर्व कुटुंबीयांना खूप जड जात आहे. चार वर्षांपासून बहीण आमच्या संपर्कात नव्हती,' अशी प्रतिक्रिया त्याने दिली. डॉ. शाहीनचा घटस्फोटित पती डॉ. जाफर हयात यांनीही डॉ. शाहीनच्या कृत्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले.ती तिच्या मुलांची चांगली काळजी घ्यायची. तिने कधीही बुरखा परिधान केला नाही, असे त्यांनी सांगितले. घटस्फोटानंतर तिच्याशी कधीही संपर्क झाला नाही, असे ते म्हणाले.दिल्ली स्फोटापूर्वी तपास यंत्रणेने केलेल्या कारवाईत अटक करण्यात आलेल्या डॉक्टरांशी केवळ व्यावहारिक संबंध होते, असे स्पष्टीकरण 'अल फलाह' विद्यापीठाने दिले आहे. विद्यापीठाने एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठ ही जबाबदार संस्था असून, तपास यंत्रणांना सर्व प्रकारचे सहाय्य केले जाईल, असे विद्यापीठाने म्हटले आहे.

## आसाममध्ये पाच जणांना अटक

डॉ. शाहीनचा घटस्फोटित पती डॉ. जाफर हयात यांनीही डॉ. शाहीनच्या कृत्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले.ती तिच्या मुलांची चांगली काळजी घ्यायची. तिने कधीही बुरखा परिधान केला नाही, असे त्यांनी सांगितले. घटस्फोटानंतर तिच्याशी कधीही संपर्क झाला नाही, असे ते म्हणाले.दिल्ली स्फोटापूर्वी तपास यंत्रणेने केलेल्या कारवाईत अटक करण्यात आलेल्या डॉक्टरांशी केवळ व्यावहारिक संबंध होते, असे स्पष्टीकरण 'अल फलाह' विद्यापीठाने दिले आहे. विद्यापीठाने एक निवेदन प्रसिद्ध केले आहे.

जमात-ए-इस्लामी वेगळे नाव धारण करून काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी कारवाया सुरू करणार असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी हे छापे टाकले. कुलगाम, पुलवामा, शोपियाँ, बारामुल्ला आणि गांदरबल जिल्ह्यात हे छापे टाकण्यात आले. दहशतवाद्यांचे जाळे उद्ध्वस्त करण्याच्या मोहिमेचा हा भाग असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी सांगितले, की दक्षिण काश्मीरमध्ये कुलगाम जिल्ह्यात दोनशे ठिकाणी छापे टाकले. गेल्या चार दिवसांत चारशेहून अधिक वेळा शोधमोहिमा विविध ठिकाणी हाती घेण्यात आल्या. पाचशे जणांची चौकशी करण्यात आली. संशयित साहित्य जप्त करण्यात आले. बारामुल्लामध्ये ३०हून अधिक ठिकाणी छापे टाकण्यात आले. इतर जिल्ह्यांतही पोलिसांची कारवाई सुरू आहे.आसाममध्ये दिल्ली स्फोटाशी संबंधित प्रक्षोभक मजकूर सामाजिक माध्यमावर पोस्ट केल्यामुळे पाच जणांना अटक करण्यात आली.मुख्यमंत्री हिमंता बिस्व शर्मा यांनी बुधवारी ही माहिती दिली. सामाजिक माध्यमांचा गैरवापर करणाऱ्यावर तातडीने कारवाई केली जाईल, असे ते म्हणाले.लखनौ/कानपूर: दहशतवाद्यांशी संबंध असलेल्या आरोपांवरून अटक करण्यात आलेल्या डॉ. शाहीन सईदच्या भाऊ महंमद शोएब तिच्या अटकेवरून आश्चर्य व्यक्त केले आहे. 'डॉ. शाहीन अशा बेकायदा कृत्यांत सहभागी असेल, हे स्वीकारण्यास आम्हा सर्व कुटुंबीयांना खूप जड जात आहे. चार वर्षांपासून बहीण आमच्या संपर्कात नव्हती,' अशी प्रतिक्रिया त्याने दिली.

# दिल्ली स्फोट हा दहशतवादी हल्लाच!

## सरकारकडून कठोर कारवाईची ग्वाही;मंत्रिमंडळाने मंजूर केला ठराव

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्रिमंडळाने दिल्लीतील लाल किल्ल्याच्या जवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या कार स्फोटाचा बुधवारी निषेध केला आहे. तसेच मंत्रिमंडळाने या स्फोटाला "भयंकर दहशतवादी घटना" असेही म्हटले आहे. याबरोबरच या घटनेचे गुन्हेगार, त्यांचे साथीदार आणि त्यांच्या प्रायोजकांना न्याय व्यवस्थेसमोर आणण्याचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मंत्रिमंडळाने या हल्ल्यात झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त करणारा ठराव मंजूर केला आणि पीडितांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटांचे मौन पाळले."देशाने १० नोव्हेंबर रोजी लाला किल्ल्याच्या जवळ एका कार स्फोटाच्या माध्यमातून देशविरोधी शक्तींनी घडवून आणलेली एक भयंकर दहशतवादी घटना पाहीली आहे," असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वाचून दाखवलेल्या ठरावात म्हटले आहे.यावेळी मंत्रिमंडळाने शोकाकुल कुटुंबांप्रति संवेदना व्यक्त केल्या आणि जखमी झालेले नागरिक लवकरात लवकर बरे व्हावेत यासाठी प्रार्थना केली. तसेच मंत्रिमंडळाने पीडितांना तात्काळ मदत पुरवणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कामाचेही कौतुक केले.हा स्फोट एक क्रूर आणि भ्याड कृत्य होते असे मंत्रिमंडळाने म्हटले. तसेच यावेळी



मंत्रिमंडळाकडून दहशतवादाच्या सर्व फॉर्म्स आणि मॅनिफेस्टेशन यांच्याबद्दल भारताच्या झिरो-टॉलरन्स पॉलिसीची पुनरुच्चार देखील यावेळी करण्यात आला. तसेच, मंत्रिमंडळाने जगभरातील विविध देशांच्या सरकारांकडून मिळालेल्या पाठिंब्याची दखल देखील घेण्यात आली.तसेच संकटाच्या काळात धाडस आणि सहानुभूतीने कृती करणाऱ्या सुरक्षा यंत्रणा, अधिकारी आणि नागरिक यांच्याकडून वेळेवरील आणि समन्वयित प्रतिसाद देण्यात आल्याबद्दल त्यांचे मंत्रिमंडळाकडून कौतुक करण्यात आले. यावेळी मंत्रिमंडळाने तपास यंत्रणांना या घटनेचा तपास अत्यंत तत्परतेने आणि व्यावसायिकतेने करण्याचे निर्देश दिले आहेत आणि सरकार परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे असेही यावेळी सांगण्यात आले.अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत मंत्रिमंडळाने या हल्ल्यात झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त करणारा ठराव मंजूर केला.

## कुटुंबांप्रति संवेदना व्यक्त

आणि पीडितांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दोन मिनिटांचे मौन पाळले."देशाने १० नोव्हेंबर रोजी लाला किल्ल्याच्या जवळ एका कार स्फोटाच्या माध्यमातून देशविरोधी शक्तींनी घडवून आणलेली एक भयंकर दहशतवादी घटना पाहीली आहे," असे केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी वाचून दाखवलेल्या ठरावात म्हटले आहे. यावेळी मंत्रिमंडळाने शोकाकुल कुटुंबांप्रति संवेदना व्यक्त केल्या .

# शाहरुख खान करतो घरातली कामं

आजपर्यंत शाहरुख खानने अनेक हिट सिनेमे केले. रोमँटिक, ॲक्शन आणि कॉमेडी सर्व प्रकारच्या सिनेमांमध्ये त्याने महत्त्वाच्या भूमिका केल्या. २०१८ च्या 'झिरो' चित्रपटानंतर शाहरुख खान बराच काळ चित्रपटांपासून दूर राहिला आणि चार वर्षे पूर्ण केल्यानंतर तो २०२३ मध्ये 'पठाण' चित्रपटात दिसला. यानंतर त्याचा 'जवान' चित्रपट प्रदर्शित झाला आणि तोही ब्लॉकबस्टर ठरला आणि त्यानंतर तो 'डंकी'मध्येही दिसला. आता शाहरुख पुन्हा एकदा चित्रपटांमध्ये ॲक्टिव्ह झाला आहे, पण जेव्हा तो ब्रेकवर होता तेव्हाही तो 'आस्क मी एनीथिंग' सेशनद्वारे त्याच्या चाहत्यांशी संपर्क साधत होता.शाहरुख खानने स्वतःबद्दल सांगितले की, जेव्हा तो शूटिंग करत नसतो तेव्हा तो काहीही करत नाही.
अलीकडेच किंग खान मुंबईत झालेल्या 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट'च्या उद्घाटन समारंभाला उपस्थित होता.

# अबीर गुलालवरील बंदीनंतर, वाणी कपूर सावध

काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी मोठा दहशतवादी हल्ला झाला. यानंतर दहशतवाद्यांविरोधात देशभरातून तीव्र निषेध करण्यात आला. अनेक कलाकारांनीही सोशल मीडियामार्फत पोस्ट करीत त्यांच्या भावना व्यक्त केल्या; तर हल्ला झाल्यानंतर सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले. पाकिस्तानचे सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन करण्यात आले, तर काही दिवसांपूर्वीच काश्मीरमध्ये हल्ला झाल्यानंतर पाकिस्तानी कलाकार सहभागी असलेल्या कलाकृतींवर बंदी आणली. यासह काही दिवसांनंतर आता पाकिस्तानी कलाकारांचेही सोशल मीडिया अकाउंट भारतात बॅन केले आहेत. गेल्या काही दिवसांत पाकिस्तानी अभिनेता फवाद खान मुख्य भूमिकेत असलेल्या 'अबीर गुलाल' या चित्रपटाची बरीच चर्चा झाली होती. हा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित होणार होता. परंतु, काश्मीरमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या चित्रपटाला बॅन करण्यात आलं आहे.यामध्ये फवाद खानसह अभिनेत्री वाणी कपूरही मुख्य भूमिकेत होती. पण, चित्रपटाला बॅन करण्यात आल्याने आता वाणी कपूरने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवरून 'अबीर गुलाल' चित्रपटाच्या संदर्भातील सर्व फोटो व्हिडीओ डिलीट केले आहेत.'अबीर गुलाल' चित्रपटातून फवाद खान तब्बल नऊ वर्षांनी बॉलीवूडमध्ये पुनरागमन करणार होता; तर शेवटचा तो 'ए दिल है मुश्कील' या चित्रपटात झळकला होता.





# अमिषा-बिपाशात 36 चा आकडा

बॉलीवूडमध्ये 'कॅटफाईट्स'चे एक-दोन नव्हे तर अनेक किस्से आहेत. बबिता-नीतू कपूर, ऐश्वर्या राय-राणी मुखर्जी, प्रियांका चोप्रा-करीना कपूर, दीपिका पदुकोण-कतरिना कैफ, कंगना रणौत-तापसी पन्नू आणि स्वरा भास्कर अशी अनेक नावे आहेत. यापैकी एक नाव अमिषा पटेल आणि बिपाशा बासू यांचेही आहे. दोघांमध्ये ३६ चा आकडा आहे. करण जोहरच्या 'कॉफी विथ करण' या कार्यक्रमात दोघांनीही एकमेकांवर टीका केली होती.'फिल्मी मंत्रा'ला दिलेल्या मुलाखतीत अमिषा पटेलने स्पष्ट केले की तिने कधीही कोणाशीही भांडण केले नाही. हे प्रकरण बिपाशा बासूच्या 'जिस्म' या चित्रपटाशी संबंधित आहे. बॉलीवूडमधील भांडणं 'कॉफी विथ करण' या लोकप्रिय चॅट शोशी जोडलेले आहे. या शोमध्ये सहभागी होताना बिपाशा बासू आणि अमिषा पटेल यांनी एकमेकांबद्दल अशा कमेंट केल्या की त्या एकमेकांच्या कट्टर शत्रू बनल्या. आता 'गदर' अभिनेत्री म्हणते की त्यांच्यात असे काहीही नाही. तिने या गोष्टींना केवळ अफवा म्हटलं आहे.'कॉफी विथ करण'च्या एका भागात बिपाशा बासूने केलेल्या बॉडी-शेमिंगबद्दल विचारले असता, अमिषा म्हणाली, "मी कधीही त्यावर प्रतिक्रिया दिली नाही.

# 'त्या' वक्तव्यामुळे सोनू निगम अडचणीत

बॉलीवूडच्या काही प्रसिद्ध गायकांपैकी एक म्हणजे सोनू निगम. सोनू निगमने आजवर आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केलं आहे. त्याच्या आवजाचे आज केवळ देशभरातच नव्हे तर जगभरात लाखों चाहते आहेत. आपल्या गाण्यांमुळे कायमच चर्चेत असणारा सोनू निगम त्याच्या एका वक्तव्यामुळे अडचणीत सापडला आहे. नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये एका चाहत्याने गायकाकडे कन्नड गाण्याची मागणी केली असता सोनू निगमने त्याच्या वागण्याची तुलना थेट पहलगाम हल्ल्याशी केली आणि यामुळेच सोनू निगमविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली आहे. सोनू निगमच्या नुकत्याच झालेल्या कॉन्सर्टमध्ये तो हिंदी गाणं गात असताना एका विद्यार्थ्याने 'कन्नड कन्नड' ओरडत कन्नडमध्ये गाणं गाण्याची मागणी केली. यावर सोनूने मध्येच गाणे थांबवले आणि म्हटले की, "मी माझ्या कारकिर्दीत अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत, परंतु मी गायलेली सर्वोत्तम गाणी कन्नडमध्ये आहेत. मी जेव्हा जेव्हा तुमच्या शहरात येतो, तेव्हा मला खूप प्रेम आणि आदर मिळतो. तुम्ही माझ्यावर कुटुंबीयांसारखे प्रेम केले आहे. पण जेव्हा माझ्या कारकिर्दीइतकंही वय नसलेलं मुलं येऊन असं वागतं तेव्हा ते वाईट वाटते." यापुढे त्याने "यामुळेच पहलगामसारख्या घटना घडतात" असंही म्हटलं.सोनू निगमने चाहत्याने त्याच्याकडे जी मागणी केली होती,



# शगुन शर्मा अमन वर्माला करतेय डेट

'क्योंकि सास भी कभी बहू थी' या लोकप्रिय मालिकेचा दुसरा सीझन २५ वर्षांनी प्रेक्षकांच्या भेटीला आला. सध्या या मालिकेला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. या मालिकेत स्मृती इराणी पुन्हा एकदा 'तुलसी' या भूमिकेत आहे. तर हितेन तेजवानी, अमर उपाध्याय आणि इतर अनेक कलाकारही या मालिकेत त्यांची जुनी पात्रे साकारताना दिसत आहेत. या मालिकेत नकारात्मक भूमिका साकारणाऱ्या शगुन शर्माने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल खुलासा केला आहे. हॉटरफ्लायला दिलेल्या मुलाखतीत शगुनने तिच्या लव्ह लाइफबद्दल सांगितलं. शगुनने प्रेमाची कबुली दिली आहे. महत्त्वाचं म्हणजे शगुन मालिकेत तिच्या धाकट्या भावाच्या भूमिकेत असलेल्या अभिनेत्याच्याच प्रेमात आहे. शगुन शर्मा तिचा सह-कलाकार अमन गांधीला डेट करत आहे. अमन 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' मध्ये शगुनच्या धाकट्या भावाची भूमिका साकारत आहे. बहीण-भावाची भूमिका साकारण्यासाठी हा शो साइन करण्यापूर्वी दोघांनी यावर चर्चा केली होती, असंही शगुनने नमूद केलं.शगुन तिच्या व अमनच्या नात्याबद्दल म्हणाली, "या अफवा नाहीत, हे खरं आहे. पण आम्ही मालिकेत काम सुरू केल्यावर डेटिंग करायला सुरुवात केली नव्हती; आम्ही त्याआधीपासून एकत्र होतो." एका पॉडकास्टमध्ये अमनने शगुनबरोबर एक वर्षापेक्षा जास्त काळापासून रिलेशनशिपमध्ये असल्याची कबुली दिली. शगुनआधी अमनची 'क्योंकि सास भी कभी बहू थी २' मधील रितिक विरानीच्या भूमिकेसाठी निवड झाली होती. त्यानंतर शगुनला मालिका ऑफर झाली. शगुनने ऑफर आल्यावर अमनशी याबद्दल चर्चा केली होती. खऱ्या आयुष्यात बॉयफ्रेंड असलेला अमन शोमध्ये तिच्या भावाची भूमिका साकारण्यास तयार आहे की नाही, असं तिने विचारलं होतं. सुरुवातीला सेटवर कोणालाही शगुन आणि अमनच्या नात्याबद्दल माहिती नव्हती, परंतु दोन महिन्यांनंतर या जोडप्याने स्वतःच सर्वांना अधिकृतपणे सांगितलं. काही आठवड्यांपूर्वी शगुन अमनच्या पॉडकास्टमध्ये व्यक्त झाली होती. "मी इथे असण्याचं एक मोठं कारण म्हणजे हा माणूस आहे. आम्ही या मालिकेबद्दल खूप चर्चा केली होती. अमन आणि माझ्या बहिणीचं म्हणणं होतं की मी ही भूमिका करावी," असं शगुन म्हणाली होती. अमनबरोबर एकत्र काम करण्याबद्दल शगुन म्हणाली, "त्याच्या बहिणीची भूमिका पडद्यावर साकारण्याचा माझ्यावर फारसा परिणाम होत नाही. आमचे असे एकत्र सीन नसतात, ज्यात आम्ही भाऊ-बहीण आहेत, हे अधोरेखित करायचं असतं. माझी आवडती गोष्ट म्हणजे आम्हाला रोज एकत्र जेवण करायला मिळतं आणि एकत्र जास्त वेळ घालवता येतो. या मालिकेमुळे आमच्यातील मैत्री अधिक घट्ट झाली आहे."शोमध्ये शगुन नकारात्मक भूमिकेत आहे. त्यामुळे अमनला अनेकदा विचारलं जातं की तो तिला का डेट करतोय? शोमधील तिच्या भूमिकेसाठी शगुनला सोशल मीडियावरून तिला द्वेषाचा सामना करावा लागतो.

## उभंही राहायला जमेना

## अय्यरच्या दुखापतीबाबत धडकी भरवणारी माहिती समोर

# ऑक्सिजन पातळी 50वर, डोळ्यासमोर अंधारी

## श्रेयस अय्यरची प्रकृती नेमकी कशी



।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाविरूद्धची वनडे मालिका रोहित शर्माचे शतक वगळता भारतीय संघासाठी फारशी चांगली ठरली नाही. वनडे मालिकेत संघाला २-१ ने पराभव पत्करावा लागला. यादरम्यान वनडे संघाचा महत्त्वाचा फलंदाज श्रेयस अय्यरला सामन्यादरम्यान दुखापत झाली होती. श्रेयस अय्यरला फिल्डिंग करताना गंभीर दुखापत झाली होती. यानंतर त्याला तात्काळ रूग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. दुखापतीनंतर श्रेयसची अवस्था कशी होती, याबाबत माहिती समोर आली आहे.**

ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर भारत आता दक्षिण आफ्रिकेविरूद्ध भिडताना दिसणार आहे. भारत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन कसोटी सामने, तीन एकदिवसीय सामने आणि पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळेल. कसोटी सामने १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे सुरू होतील. यानंतर वनडे मालिकेसाठीदेखील संघाची घोषणा करण्यात येणार आहे. पण या मालिकेत श्रेयस अय्यर खेळणार की नाही याबाबत शंका असेल.ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात श्रेयस अय्यरला दुखापतीनंतर बरेच दिवस हॉस्पिटलमध्ये होता. यानंतर श्रेयस अय्यर दुखापतीतून हळूहळू बरा होत आहे. श्रेयर अय्यरच्या फिटनेसबाबत निवड समितीला माहिती देण्यात आली आहे आणि वैद्यकीय अहवालानुसार त्याला पूर्णपणे मॅच-फिट होण्यासाठी अजून किमान महिनाभर लागणार आहे. पण या दुखापतीनंतर श्रेयस अय्यरची प्रकृती खूप गंभीर होती, याबाबत आता खुलासा झाला आहे.इंडियन एक्सप्रेसशी बोलताना भारतीय क्रिकेट बोर्डातील एका सूत्राने सांगितले, "त्याला पूर्ण फिटनेस मिळवण्यासाठी अजून वेळ लागणार आहे. बोर्ड आणि निवड समितीला त्याच्या दुखापतीनंतर पुनरागमनाची घाई करायची नाही. त्यामुळे तो दक्षिण आफ्रिका वनडे मालिका खेळेल की नाही याबाबत शंका आहे."सूत्रांनी सांगितलं की, अय्यरचा ऑक्सिजन लेव्हल ५० पर्यंत खाली गेली होती आणि सुमारे दहा मिनिटांपर्यंत तो नीट उभाही राहू शकला नाही. त्याच्या डोळ्यासमोर अंधारी आली होती आणि त्याला नॉर्मल व्हायला थोडा वेळ लागला.श्रेयस अय्यरला गेल्या आठवड्यात रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. ॲलेक्स केरीचा कॅच झेलण्यासाठी अय्यरने डाइव मारली आणि जमिनीवर पडताना त्याला डाव्या बाजूला दुखापत झाली. त्यानंतर त्याला अंतर्गत रक्तस्रावासह प्लीहा (SPLEEN) वर झालेल्या जखमेच्या कारणामुळे सिडनीतील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्याची प्रकृती बिघडल्याने आयसीयुमध्येही दाखल करण्यात आलं होतं. यासह तो आठवडाभर हॉस्पिटलमध्ये दाखल होता.हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाल्यानंतर श्रेयस अय्यरने काही दिवसांनी बीचवर वेळ घालवतानाचा फोटो शेअर करत त्याच्या प्रकृतीचे स्वतः अपडेट दिले होते.ऑस्ट्रेलियाविरूद्धची वनडे मालिका रोहित शर्माचे शतक वगळता भारतीय संघासाठी फारशी चांगली ठरली नाही. वनडे मालिकेत संघाला २-१ ने पराभव पत्करावा लागला. यादरम्यान वनडे संघाचा महत्त्वाचा फलंदाज श्रेयस अय्यरला सामन्यादरम्यान दुखापत झाली होती. श्रेयस अय्यरला फिल्डिंग करताना गंभीर दुखापत झाली होती. यानंतर त्याला तात्काळ रूग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. दुखापतीनंतर श्रेयसची अवस्था कशी होती, याबाबत माहिती समोर आली आहे.भारत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन कसोटी सामने, तीन एकदिवसीय सामने आणि पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळेल. कसोटी सामने १४ नोव्हेंबरपासून कोलकाता येथील ईडन गार्डन्स येथे सुरू होतील. यानंतर वनडे मालिकेसाठीदेखील संघाची घोषणा करण्यात येणार आहे. पण या मालिकेत श्रेयस अय्यर खेळणार की नाही याबाबत शंका असेल.ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात श्रेयस अय्यरला दुखापतीनंतर बरेच दिवस हॉस्पिटलमध्ये होता. यानंतर श्रेयस अय्यर दुखापतीतून हळूहळू बरा होत आहे. श्रेयर अय्यरच्या फिटनेसबाबत निवड समितीला माहिती देण्यात आली आहे आणि वैद्यकीय अहवालानुसार त्याला पूर्णपणे मॅच-फिट होण्यासाठी अजून किमान महिनाभर लागणार आहे.

### अय्यरची प्रकृती खूप गंभीर

पण या दुखापतीनंतर श्रेयस अय्यरची प्रकृती खूप गंभीर होती, याबाबत आता खुलासा झाला आहे.इंडियन एक्सप्रेसशी बोलताना भारतीय क्रिकेट बोर्डातील एका सूत्राने सांगितले, "त्याला पूर्ण फिटनेस मिळवण्यासाठी अजून वेळ लागणार आहे. बोर्ड आणि निवड समितीला त्याच्या दुखापतीनंतर पुनरागमनाची घाई करायची नाही. त्यामुळे तो दक्षिण आफ्रिका वनडे मालिका खेळेल की नाही याबाबत शंका आहे.

# भारत-आफ्रिका सामन्याची वेळ बदलली!

## या सामन्यांच्या मालिकेत मोठा बदल करण्यात आला



।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या भारत दौऱ्यावर असून दोन्ही संघांमध्ये तिन्ही फॉरमॅटमध्ये मालिका खेळवल्या जातील. येत्या १४ नोव्हेंबरपासून भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील कसोटी मालिकेला सुरूवात होणार आहे. तर दुसरा सामना २२ नोव्हेंबरपासून दुसरा कसोटी सामना गुवाहाटीत खेळवला जाईल. कसोटी मालिकेतील हे दोन्ही सामने किती वाजता खेळवले जाणार आणि सामन्याच्या वेळेत झालेला बदल नेमका काय आहे, पाहूया.**

भारत आणि दक्षिण आफ्रिका कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यापूर्वी वेळेत बदल झाल्याची माहिती समोर येत आहे. शिवाय, काही दिवसांपूर्वी, या सामन्यातील लंचब्रेक आणि टी-ब्रेकमध्ये बदल होणार असल्याचेही वृत्त समोर आले होते. यामुळे परंपरागत चालत आलेल्या कसोटी क्रिकेटमध्ये मोठा बदल पहिल्यांदाच पाहायला मिळू शकतो.भारतात कसोटी वाजता सुरू होतात. सामन्याच्या पहिल्या दिवशी सकाळी ९ वाजता नाणेफेक होते.

### शेवटचे सत्र दुपारी २:३० वाजता

दुसरे सत्र दुपारी १२:१० ते २:१० पर्यंत असेल, त्यानंतर दुपारी २:३० पर्यंत २० मिनिटांचा टी-ब्रेक असेल. शेवटचे सत्र दुपारी २:३० वाजता सुरू होईल, जे संध्याकाळी ४:३० किंवा ५ वाजता संपेल.गुवाहाटीमधील दुसऱ्या कसोटी सामन्याच्या वेळेत आता बदल करण्यात आला आहे. ईएसपीएनक्रिकइन्फोने बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांच्या हवाल्याने म्हटलं आहे की, गुवाहाटी हे ईशान्य भारतात आहे.

पण गुवाहाटीमधील सामन्याच्या वेळेत बदल होणार आहे. सध्या या बदलाची माहिती समोर येत आहे आणि बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांचेही याबाबतचे निवेदन समोर आलं आहे. तर क्रिकबझ आणि क्रिकइन्फोमध्येही सामन्याच्या बदललेल्या वेळा दिसत आहेत. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मालिकेतील पहिला सामना वेळापत्रकानुसार कोलकाता येथे होईल. पहिल्या दिवशी सकाळी ९:०० वाजता नाणेफेक होईल आणि खेळ सकाळी ९:३० वाजता सुरू होईल. त्यानंतर ११.३० ला लंचब्रेक होईल.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। गुरुवार।
। दि. 13 नोव्हेंबर 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## मिशन- PCMC: माजी आमदार विलास लांडे यांना

# महापालिका रणसंग्रामात "साईडरोल" ?

### शहराच्या राजकारणाला कलाटणी देण्याची क्षमता; पण योगेश बहल यांच्या लेखी "समन्वयक"ची जबाबदारी!




। पिंपरी चिंचवड ।
विशेष प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील मातब्बर नेते माजी आमदार विलास लांडे म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या लेखी केवळ "समन्वयक" झाले आहेत का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. निवडणुकीत भाजपासोबत दोन हात करण्याची तयार राष्ट्रवादी करीत आहे. त्यासाठी स्थानिक पातळीवर 'प्रभावशाली चेहरा' म्हणून लांडे यांना मैदानात उतरवण्याची आवश्यकता आहे. पण, शहराध्यक्ष योगेश बहल यांनी जाहीर केलेल्या कार्यकारिणीमध्ये "मुख्य समन्वयक" म्हणून नियुक्ती केली आहे. त्यामुळे महापालिका रणसंग्रामात ताकदीचा योद्धा असलेले विलास लांडे "साईडरोल" च्या भूमिकेत दिसणार आहेत.**

महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने प्रभाग रचना झाली. त्यानंतर मंगळवारी आरक्षण सोडत झाली. महापालिका निवडणूक भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अशी तगडी फाईट होईल, असे चित्र आहे. स्थानिक पातळीवर पक्षाचे संघटन आणि सक्रीयता वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शहराध्यक्ष योगेश बहल यांनी घाईघाईत पक्षाची जंबो शहर कार्यकारीणी जाहीर केली. त्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी माजी आमदार विलास लांडे यांची अनुपस्थिती जाणवली. विशेष म्हणजे, विलास लांडे नाराज आहेत का? अशीही दबक्या आवाजात चर्चा आहे. शहराच्या राजकारणातील प्रदीर्घ अनुभव आणि मुत्सद्दी नेता म्हणून विलास लांडे यांची ओळख आहे. नगरसेवकपदापासून अगदी महापौर, आमदारपदापर्यंतची कारकीर्द त्यांनी गाजवली आहे. किंबहुना, लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने शिरुर लोकसभा मतदार संघात त्यांनी यापूर्वी कामही केले आहे. "शहरात राष्ट्रवादी अजित पवार गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट युती होवू शकते. त्यासाठीचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार घेतील..." असा दावा योगेश बहल यांनी पत्रकार परिषदेत केला. किंबहुना, "शरद पवार आमचे श्रद्धास्थान आहेत आणि अजित पवार आमचे स्फूर्तीस्थान आहेत..." असेही बहल बोलते झाले. त्यामुळे राजकीय ताकद वाढवण्याठी राष्ट्रवादी+ राष्ट्रवादी या सूत्राची चर्चा सुरू आहे. मात्र, ज्यांच्या घरातील देव्हाऱ्यात शरद पवारांचा फोटो आहे. राष्ट्रवादीत दोन गट निर्माण झाले. त्यावेळीच विलास लांडे यांनी सुरूवातीपासून शरद पवारांबाबत असलेली आत्मियता जाहीरपणे बोलून दाखवली होती. आता आज जी भूमिका बहल मांडत आहेत किंवा शरद पवार गटाची साथ घ्यावी, असे अजित पवार गटाच्या लोकांना वाटते. हा प्रयोग माजी आमदार विलास लांडे यांनी विधानसभा निवडणूक- 2024 मध्येच करुन दाखवला होता. भोसरी विधानसभा मतदार संघात दोन्ही राष्ट्रवादी एकच झाल्या होत्या. ती किमया विलास लांडे यांनी केली होती. पण, दुर्दैवाने हा प्रयोग यशस्वी झाला नाही. मात्र, भाजपाला घाम फुटला होता, याचा विसर शहरातील राष्ट्रवादीच्या "कारभाऱ्यांना" पडला आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो.

तसेच, एकेकाळी शहराच्या राजकारणातील 'हिरो' म्हणून दबंग कामगिरी करणारे माजी आमदार विलास लांडे आता 'साईड रोल' करणार आहेत की, पक्षातील अतिमहत्त्वाकांक्षी लोकांमुळे निवृत्तीचा प्रवास सुरू करणार आहेत, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### राष्ट्रवादीकडे स्थानिक पातळीवर प्रभावी चेहरा हवा...

भारतीय जनता पार्टीकडून स्थानिक पातळीवर आमदार शंकर जगताप यांना 'जिल्हा निवडणूक प्रमुख' पदाची, तर आमदार महेश लांडगे यांच्यावर उत्तर पुणे जिल्ह्याची जबाबदारी आहे. पण, राष्ट्रवादीचा सर्व खेळ केवळ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अवलंबून आहे. वास्तविक, स्थानिक पातळीवर राष्ट्रवादीने शहराचे नेतृत्व करु शकेल, अशा प्रभावी नेत्याला निवडणुकीच्या मैदानात उतरवले पाहिजे. कारण, "अजितदादा आले की सुसाट... आणि गेले की सपाट..." अशी राष्ट्रवादीची स्थिती आहे. दुसरीकडे, चिंचवड, पिंपरी आणि भोसरी अशा तीनही मतदार संघात मोठा जनसंपर्क आणि परिचित असलेले माजी आमदार विलास लांडे भाजपाचे जगताप-लांडगे यांना तोडीस-तोड आव्हान देवू शकतात. तसेच, जुन्या आणि नव्यांचा मेळ घालून भाजपा विरोधाची मोट बांधू शकतात. त्या अनुशंगाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विलास लांडे यांच्यावर मोठी जबाबदारी द्यायला हवी होती. विशेष म्हणजे, मावळात राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके आणि भाजपाचे माजी आमदार बाळा भेगडे यांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक "महायुती" म्हणून लढण्याची घोषणा केली. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये वेळ पडलीच, तर मावळातील "मामा-भाचे पॅटर्न" शहरात यशस्वी करण्याची धमक विलास लांडे यांच्याकडे आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

## 12 हजार भाविकांच्या उपस्थितीत सामूहिक "अग्निहोत्र"

### भाजपा मंडलाध्यक्ष शिवराज लांडगे व निलम लांडगे यांच्या पुढाकाराने अध्यात्मिक सोहळा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी प्राधिकरण येथील त्रिवृक्ष संगम दत्त मंदिर परिसरात भव्य धार्मिक वातावरणात सामूहिक अग्निहोत्र आणि चैतन्य पादुकांचे पूजन व दर्शन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. भाजपा मंडल अध्यक्ष शिवराज लांडगे आणि इंद्रायणी प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निलम लांडगे यांच्या पुढाकाराने आयोजित भक्तिमय सोहळ्यात 12 हजाराहून अधिक भाविक सहभागी झाले.**



भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन त्रिवृक्ष संगम दत्त मंदिर, आमराई चॅरिटेबल ट्रस्ट, श्री स्वामी समर्थ चिन्मय पादुका मठ (बाळप्पा मठ) आणि विश्व फाउंडेशन, शिवपुरी अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चार आणि अग्निहोत्र विधीने झाली. सुमारे तीन हजाराहून अधिक भाविकांनी मोठ्या श्रद्धेने अग्निहोत्रात सहभागी होत चैतन्य पादुकांचे पूजन व दर्शन घेतले. परिसरात 'स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ'च्या घोषणांनी वातावरण दुमदुमले.

डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली हा संपूर्ण धार्मिक सोहळा पार पडला. त्यांनी अग्निहोत्राचे आध्यात्मिक आणि वैज्ञानिक महत्व समजावून सांगितले. कार्यक्रमानंतर सायंकाळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

> सामूहिक "अग्निहोत्र" आणि चैतन्य पादुका पूजन सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. भाविकांनी याला "आध्यात्मिक पर्वणी" म्हणून गौरविले. "भारतीय परंपरेत अग्निहोत्र हे अतिशय पवित्र मानले जाते. या अग्निहोत्र आणि चैतन्य पादुकांच्या पूजनाने परिसरात सकारात्मक उर्जा आणि शांतीचा संदेश पसरला आहे.देव-देश अन् धर्म कार्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **– शिवराज लांडगे,** मंडल अध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## विद्यार्थ्यांनी "'मुलाखत तंत्र' ते

# 'भारतीय ज्ञान परंपरा"ची घेतली माहिती!

## शिक्षण विश्व : चिंचवड येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला'

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रतिभा महाविद्यालय, चिंचवड येथे आयोजित "यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाले"त विद्यार्थ्यांनी 'मुलाखत तंत्र' ते 'भारतीय ज्ञान परंपरा' या विविध विषयांवरील माहिती व प्रेरणादायी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे बहिःशाल शिक्षण मंडळ, जेष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष आणि कमला शिक्षण संस्थेचे प्रतिभा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला" उत्साहात संपन्न झाली. या व्याख्यानमालेचे आयोजन कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा, आणि संचालिका डॉ. तेजल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

पहिल्या पुष्पात प्रमुख वक्ते डॉ. रुस्तुम दराडे यांनी 'मुलाखत तंत्र' या विषयावर मार्गदर्शन केले. मुलाखतीसाठीची तयारी, आत्मविश्वास वाढविण्याची तंत्रे आणि प्रभावी संवादाचे महत्त्व यावर त्यांनी सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या पुष्पात मुबीन तांबोळी यांनी 'हास्यहंडी धमाल' हा एकपात्री प्रयोग सादर केला. बी.एड.च्या विद्यार्थ्यांच्या अध्यापनाच्या प्रवासातील विनोदी आणि प्रेरणादायी पैलू त्यांनी हलक्याफुलक्या शैलीत मांडले. "स्वतःला ओळखा आणि दुसऱ्यांसाठी प्रेरणा बना," असा त्यांनी संदेश दिला. तिसऱ्या पुष्पात प्रमुख वक्ते डॉ. धनाजी भिसे यांनी 'भारतीय ज्ञान परंपरा काळाची गरज' या विषयावर भाष्य केले. प्राचीन काळापासून आधुनिक मानवाच्या प्रवासातील बदल आणि भारतीय तत्त्वज्ञानाची आजच्या काळातील उपयुक्तता त्यांनी उत्कृष्ट उदाहरणांसह स्पष्ट केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुशील भोंग यांनी केले, तर अध्यक्षस्थान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांनी भूषविले. या व्याख्यानमालेत महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

---

## भगवान श्रीकृष्णांना ५६ भोग अर्पण करून अन्नकूट महोत्सव साजरा

## महेश मंडळ सांगवीतर्फे स्नेहमिलन व अन्नकूट उत्सवाचे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दीपावलीच्या पार्श्वभूमीवर सांगवी परिसरातील महेश मंडळ यांच्या वतीने दीपावली स्नेहमिलन सोहळा व अन्नकूट महोत्सव मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम पिंपळे गुरव येथील श्रीकृष्ण मंदिरात पार पडला.**



कार्यक्रमाची सुरुवात भगवान श्रीकृष्णांच्या महाआरतीने झाली. त्यानंतर भगवान श्रीकृष्णांना ५६ भोगांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. मंदिर परिसर श्रीकृष्ण नामस्मरण, आरत्या आणि भक्तिगीतांनी दुमदुमून गेला होता. यावेळी बोलताना सतीश लोहिया म्हणाले पौराणिक कथेनुसार, भगवान श्रीकृष्णांनी गोकुळवासीयांना सांगितले की, आपण इंद्रदेवाऐवजी गोवर्धन पर्वताची पूजा करावी, कारण हाच पर्वत आपल्या गायांसाठी चारा आणि जीवनदायी साधन उपलब्ध करून देतो. यामुळे इंद्रदेव रुष्ट होऊन गोकुळावर मुसळधार पाऊस पाडू लागले. त्यावेळी भगवान श्रीकृष्णांनी गोवर्धन पर्वत आपल्या करांगळीवर सात दिवस उचलून गोकुळाची रक्षा केली.या स्मृतीप्रीत्यर्थ दरवर्षी अन्नकूट महोत्सव साजरा करण्याची आणि भगवानाला ५६ भोग अर्पण करण्याची परंपरा आजही चालू आहे.

या वेळी सतीश लोहिया, निलेश अटल, मधुसूदन भाला, गौरी नावंदर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मनोज अटल यांनी केले, तर आयोजन यशस्वी होण्यासाठी मुकुंद तापडिया, विवेक गजानंद बिहानी, कुलदीप बजाज, आदींनी परिश्रम घेतले.

मंदिर परिसरात दिव्यांच्या प्रकाशात, श्रीकृष्ण नामस्मरणाच्या गजरात आणि भक्तिभावाने भारलेल्या वातावरणात अन्नकूट महोत्सव उत्साहात पार पडला.

## हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या

# वाढदिवसानिमित्त शालेय क्रीडा स्पर्धा!

### युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव आणि इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्षा निशा यादव यांचा पुढाकार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनेशभाऊ यादव युवा मंच आणि शेठ माणिकचंद फाउंडेशन यांच्या वतीने संचलित विश्वकल्याण इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजतर्फे शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती भारतीय जनता युवा मोर्चा शहराध्यक्ष दिनेश यादव यांनी दिली.**




ही स्पर्धा १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी साडेआठ वाजता शनी मंदिर ग्राउंड, पूर्णानगर येथे पार पडणार आहे. या क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांसाठी मल्लखांब, दंडपट्टा, लाठी-काठी, मार्शल आर्ट्स, फायर जंप, कराटे तसेच विविध पारंपरिक खेळांचा समावेश करण्यात आला आहे. या उपक्रमाचे आयोजन इंद्रायणी महिला प्रतिष्ठान अध्यक्षा निशा दिनेश यादवयांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक दिनेश लालचंद यादव आहेत. याबाबत दिनेश यादव म्हणाले, या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि भारतीय पारंपरिक खेळांविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे. तरुणांनी, खेळाडूंनी या स्पर्धांमध्ये भरभरून सहभाग घ्यावा तसेचकार्यक्रमाला परिसरातील नागरिक, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन दिनेश यादव यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांना घेतला "स्पेस सफर"चा अनुभव!

### शिक्षण विश्व: प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथील उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी कॉसमॉस डोम प्लॅनेटेरियम टीम तर्फे "स्पेस का सफर" हा विशेष विज्ञान उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना विश्वातील रहस्यमय आणि आकर्षक जगाची थेट सफर अनुभवता आली.**




विद्यार्थ्यांसाठी आवर्जून तयार करण्यात आलेल्या विशेष डोम थिएटरमध्ये विद्यार्थ्यांनी तारे, ग्रह, आकाशगंगा आणि अंतराळातील विविध विस्मयकारक जगाचा अनुभव घेतला. हे सत्र संवादात्मक पद्धतीने, विद्यार्थ्यांना समजेल अशा सोप्या भाषेत पार पडले.

नर्सरीपासून बारावीपर्यंतच्या एक हजार पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. प्रश्नमंजुषा आणि छोट्या चर्चांमुळे विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्राविषयीची जिज्ञासा आणि विज्ञानाविषयीचा उत्साह अधिक वाढला.

"स्पेस का सफर" या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना वर्गात शिकलेल्या विज्ञान विषयक संकल्पना आणि प्रत्यक्ष जीवनातील अंतराळ विज्ञान यांचा सुंदर संगम अनुभवता आला.


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune